बृहन्मुंबई महानगरपालिका

सहाय्यक आयुक्त डी विभाग, जोबनपुत्र कम्पाऊंड, नाना चौक, ग्रँट रोड, मुंबई-४०००००७

क्र. स.आ.डी. / ८४६ / सहा. अभि. /घ.क.व्य. /डी दि. १३/११/२०२६

स्वारस्य अभिव्यक्ती

'डी' विभागातील महत्वाच्या पर्यटन स्थळांच्या आजूबाजूच्या रस्त्यांची साफ सफाई करणे या कामासाठी अशासकीय संस्थांची नेमणूक करण्याबाबत इच्छुक संस्थांकडून त्यांची पात्रता यादी तयार करून काम करण्यासाठी अर्ज मागवित आहे. इच्छुक नोंदणीकृत संस्थांना पर्यटन स्थळांच्या साफसफाईच्या कामाबाबतचा अनुभव असणे आवश्यक आहे.

सदर कामासाठी यापूर्वी क्र. स.आ.डी. / ८१९ / सहा. अभि. /घ.क.व्य. /डी दि. ०२/ ११ /२०२६ अन्वये दि.०३/११/२०२६ ते दि.०९/११/२०२६ पर्यंत स्वारस्य अभिव्यक्ती/ईच्छापत्रे मागविण्यात आलेली होती परंतू, दि.०९/११/२०२६ रोजी दिवाळी सणाच्या अनुषंगाने मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील राज्य शासकीय व निमशासकीय कार्यालयांना दि.०९/११/२०२६ रोजी अचानक स्थानिक सुट्टी जाहीर करण्यात आली. तसेच दि.०९/११/२०२६ ते दि.११/११/२०२६ रोजी कार्यालयांना सार्वजनिक सुट्टी होती. त्यामुळे स्वारस्य अभिव्यक्ती / ईच्छापत्र भरणाऱ्या अशासकीय संस्थांना पुरेसा कालावधी उपलब्ध झाला नाही. त्यामुळे 'डी' विभागातील महत्वाची पर्यटन स्थळे व आजुबाजूच्या रस्त्यांची साफ सफाई करणे या कामासाठी अशासकीय संस्थांची नेमणूक करणेबाबत मागविण्यात आलेल्या स्वारस्य अभिव्यक्ती / ईच्छापत्र भरण्यासाठी इच्छुक अशासकीय संस्थांची निवड करण्याबाबत असलेल्या कामाची मुदत दि. १८/११/२०२६ पर्यन्त वाढविण्यात येत आहे.

इच्छुक नोंदणीकृत संस्थांनी याबाबतचा तपशील, अर्ज व इच्छापत्राच्या नमुन्यासाठी रु. ४७१२/- (रु.३९९३/- + १८ % जी.एस.टी.) एवढी रक्कम नागरी सुविधा केंद्रामध्ये भरणा केल्यानंतर सहा. अभियंता (घकव्य) 'डी' विभाग यांच्या कार्यालयात दि.१८/११/२०२६ पर्यंत सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत उपलब्ध करुन देण्यात येईल. 'डी' विभागात साफ सफाई या कामाचा अनुभव असलेल्या संस्थांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

संस्थेने 'डी' विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख दि.१८/ ११ /२०२६(दु.०१.०० वाजेपर्यंत) आहे.

सही/-

सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) 'डी' विभाग